महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
कृषि आयुक्तालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
जा.क्र.कृआ/आस्था-६(कक)/प्र.क्र.१७/पदो.लि/१११७/२०१८
दिनांक :- ०२/०७/२०१८

## -: आदेश :-

पुढील आदेश होईपर्यंत, रु.४४४०-७४४० ग्रेड पे-१३०० या वेतनश्रेणीत काम करीत असलेल्या खालील गट-ड शिपाई यांना रु.५२००-२०२०० ग्रेड पे-१९०० या वेतनश्रेणीत लिपीक या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून त्यांना त्यांचे नावांसमोर स्तंभ क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या अधिकाऱ्यांच्या अधिनस्त पदस्थापीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव सर्वश्री/श्रीमती | सदय कार्यरत कार्यालयाचे नाव | पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १) | घुगे सुषमा सोनाजी | संचालक (विप्र) | कृषि सहसंचालक (आस्था) |
| २) | खाडे आनंदा भिमराव | संचालक (निवगुनि) | संचालक (निवगुनि) |
| ३) | फुटाणे रोहन अमर | सहा.संचालक (लेखा-१) | सहा.संचालक (लेखा-१) |

मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या विरोधात राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधी व न्याय विभागाने दि.२८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुला प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातून रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाजेष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि.२५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागानी करावी, अशा सूचना सामान्य प्रशासन विभाग का-१६ ब दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.

त्यानुसार उक्त आदेश प्रशासकीय कारणास्तव व केवळ तात्पुरत्या स्वरुपात निर्गमित करण्यात येत असून त्यांची पदोन्नती ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहील.

१. स्वतंत्र लिपीक संवर्गातील याचिका क्रमांक २८०५/९८ मध्ये न्यायालयाकडून स्वतंत्र लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या जेष्ठता सूचीबाबत जे आदेश प्राप्त होतील, त्या निर्णयाच्या अधीन संबंधित कर्मचाऱ्यांची पदोन्नती राहील.

२. आदेशातील पदोन्नत होणाऱ्या लिपीकांना आश्वासीत प्रगती योजने अंतर्गत पहिला/दुसरा अथवा दोन्ही लाभ (वरिष्ठ वेतनश्रेणी) दिला असल्यास संबंधितांनी प्रत्यक्ष पदोन्नती नाकारल्यास वित्त विभाग शासन शुध्दीपत्रक क्रमांक: आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दिनांक २३ डिसेंबर २०१५ मधील तरतुदीनुसार देणेत आलेले लाभ काढून घेण्यात येतील, मात्र दिलेल्या लाभांची वसूली करण्यात येणार नाही.

तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही २०१५/प्र.क्र. ३०३/का.१२, दि. १२.०९.२०१६ मधील तरतुदीनुसार वरचे संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर अथवा तत्पुर्वीच एखादया कर्मचाऱ्यांने पदोन्नतीचे पद स्विकारण्यास नकार दर्शविल्यास त्यांचे नाव पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसुच्यांमध्ये संबंधीत कर्मचाऱ्यांच्या नावाचा विचार केला जाणार नाही.

३. कृषि विभागाच्या दुय्यम सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी विहीत केलेली सेवा प्रवेशोत्तर परिक्षा विहीत मुदतीत/विहीत संधीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४. नियमानुसार विहीत मुदतीत हिंदी/मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे/होणेपासून सुट प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील.

५. MS CIT संगणक अर्हता प्रमाणपत्र विहीत मुदतीत प्राप्त करुन सादर करणे आवश्यक राहील.

६. उपरोक्त पदोन्नती अधिन कर्मचाऱ्यांनी ३० दिवसाच्या आत पदोन्नतीच्या पदावर हजर व्हावे. अन्यथा त्यांना पदोन्नती स्विकारायची नाही, असे गृहित धरुन त्यांचेपुरते पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील.

७. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन/१०९५/सीआर-८३/९५/सेवा-३ दिनांक १९.१२.१९९५ मधील तरतुदीनुसार पदोन्नती अधीन कर्मचाऱ्यांनी सुधारीत वेतन निश्चितीबाबतचा विकल्प एक महिन्याचे आत देणे आवश्यक आहे. वेतन निश्चितीबाबत मुदतीत विकल्प न दिल्यास त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) (ए) नुसार करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

प्रस्तुत आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

पुणे-४११ ००१
दि. ०२/०७/२०१८

स्वाक्षरीत /-

**(सचिन्द्र प्रताप सिंह)**
**आयुक्त (कृषि)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

प्रतिलिपी :- माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. कृषि संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. कृषि सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. विभागीय कृषि सहसंचालक, पुणे विभाग पुणे
४. वरिष्ठ प्रशासन अधिकारी, (आस्था-१/२), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
५. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे
६. कृषि उपसंचालक (आयुक्त कृषि कक्ष), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१
७. प्रशासन अधिकारी (आस्था-१ सेपु/२/३/४/५) (नि.प.)(रवका)
८. सहाय्यक संचालक (लेखा-१/२), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१/५
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

१०. कार्यासन अधिकारी (---------------), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१/५

११. श्री/श्रीमती ---------------------------------------------- यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

कृषि उपसंचालक
कर्मचारी कल्याण कक्ष
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-४११ ००१